**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241 Volume - 4, Issue - 11, Nov - 2021
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 5.146
Received on : 07/11/2021 Accepted on : 20/11/2021 Publication Date: 30/11/2021

# महिला सक्षमीकरण आणि पंचायत राज व्यवस्था एक विश्लेषणात्मक अध्ययन

**सहा.प्रा.नासीर कासम शेख**
(राज्यशास्त्र विभाग प्रमुख) श्री.विठ्ठल रुक्मिनी, कला, वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय सवना, ता.महागांव, जि.यवतमाळ. (महाराष्ट्र)
Email : nasir.sheikh313@gmail.com

**सारांश :-** मानव समुहात स्त्री जातीचा जवळपास निम्मा हिस्सा आहे. महिला स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव करुन देण्यासाठी आज प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करतांना दिसुन येतात. आज जगातील महिलांना विविध क्षेत्रात सामाजिक, धार्मिक, विधी, शैक्षणिक, आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रात निर्णय घेण्यास त्यांना स्थान दिले जाते. महिला सक्षमीकरणाची समीक्षा ही मानवाधिकाराच्या नजरेतुन करण्याचे काम पंचायत राज व्यवस्था करत आहे. महिलांना सक्षम आणि सबल बनवण्या करीता आज प्रथमत: संपूर्ण देशामध्ये पाऊले उचलली आहे. महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये 33% आरक्षणाच्या माध्यमातून जागा राखीव ठेवण्यासाठी 73 वी घटना दुरुस्ती इ. सन 1990 मध्ये करण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र राज्यामध्ये स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून महिलांच्या विकासाला एक नवी दिशा मिळाली आहे. इ.सन 2011 मध्ये महाराष्ट्र राज्यामध्ये पंचायतराज व्यवस्थेमध्ये महिलांना 50 टक्के आरक्षण लागू करण्यात आले. त्यामुळे महिलांची संख्या पुरुषांबरोबर झाली. किंबहुना पुरुषांपेक्षा महिलांची संख्या जास्त झाली. म्हणजेच पूर्वीच्या काळी महिलांची क्षेत्र मर्यादीत होते. चुल व मुल यापुरतीच मर्यादित न राहता त्यांना पुरुषांच्या बरोबर राजकीय क्षेत्रात काम करण्याची संधी उपलब्ध झाल्यामुळे राष्ट्र उभारणी मध्ये महिलांचा वाटा महत्त्वाचा ठरला आहे. पंचायत राज व्यवस्थेला लोकशाहीचा पाळणा घर म्हटल्या जाते. आणि यातुनच स्थानिक, राज्य व राष्ट्रीय स्तरावर सक्षम नेतृत्व करणाऱ्या अनेक महिला आज आढळून येतात.

## 1. प्रस्तावना :-

महिलांना सार्वजनिक जीवनात स्थान देऊन राष्ट्राची निम्मी व्यर्थ जाणारी शक्ती उपयोगात आणून राष्ट्राचा उत्कर्ष केल्या जाऊ शकतो. अशा प्रकारचा विचार इ.सन पूर्व काळात राजकीय विचारवंत प्लेटो यांने मांडलेला होता. कारण कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीच्या टप्प्यात आहेत, तेथील महिलांची आर्थिक, सामाजिक आणि राजकीय स्थिती व भूमिका महत्त्वाची मानल्या जाते.

पंचायत राज व्यवस्थेत महिलांचा सहभाग वाढतो आहे. ही कौतुकास्पद बाब आहे. सध्याच्या महिला सक्षमीकरणाच्या काळात सुद्धा महिलांचे शोषण, अपमान, यातना ईत्यादीच्या शिकार महिला होताना दिसून येतात. महिलांचा दर्जा वाढविण्याकरिता त्यांना सक्षम करणे गरजेचे आहे. त्याकरिता समता, स्वातंत्र्य व न्याय महिलांना बहाल करणे क्रमप्राप्त ठरते. राजकीय क्षेत्रात महिलांना स्थान देऊन निर्णय निर्धारण प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने भारतीय संविधानात 1993-94 मध्ये 73 वी व 74 वी घटना दुरुस्ती करण्यात आली. या घटनादुरुस्तीनुसार महिलांना पंचायतराज व्यवस्थेमध्ये 33% आरक्षण देण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे महिला नेतृत्वाला एक प्रकारे चालना मिळाली.

महाराष्ट्र राज्याने याही पुढे एक पाऊल टाकत पंचायत राज व्यवस्थेत सन 2011 मध्ये महिलांसाठी 50% राखीव जागेची तरतूद केली आहे. त्यामुळे महिला पुरुषांच्या बरोबरीने किंवा त्याच्याही पुढे गेल्या. जि.प. अध्यक्ष, पंचायत समिती सभापती, गावातील गावच्या सरपंच पदावर महिला कार्यरत आहेत. पंचायतराज म्हणजे लोकशाहीचा पाळणाघर आणि यातूनच तयार झालेले महिला नेतृत्व करताना दिसतात.

## 2. संशोधनाची उद्दिष्टे :-

1) पंचायतराज व्यवस्थेचे अध्ययन करणे.
2) पंचायत राज व्यवस्थेमुळे महिलांचा दर्जा व भूमिका उंचावला असल्याचे अध्ययन करणे.
3) पंचायत राज व्यवस्थे मुळे निर्णय निर्धारण प्रक्रियेत महिलांच्या स्थानाचे अध्ययन करणे.

## 3. संशोधनाची गृहितके :-

1) महिलांच्या सक्षमीकरणा मध्ये पंचायत राज व्यवस्थेचे स्थान महत्वपुर्ण आहे.
2) पंचायत राज व्यवस्थेमुळे महिलांचे दर्जा व स्थान उंचावलेले आढळते.
3) 73 व्या घटनादुरुस्तीमुळे महिलांचा राजकीय सहभाग वाढला.

## महिला सक्षमीकरण :-

महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांच्या अंगी असलेली गुणवत्ता, कौशल्ये आणि क्षमतांचा विकास करून त्यांचे आर्थिक, सामाजिक, राजकीय तसेच शारिरीक, बौद्धिक, मानसिक स्थान उंचावणे होय. महिलांकडे शारीरिक, बौध्दीक, मानसिक क्षमता आहेत. महिला स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव करून देण्यासाठी प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करीत आहेत. महिला सक्षमीकरणात सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे तिला माणूस म्हणून जगण्याची संधी देऊन तिला तिचे व्यक्तिमत्व विकसित करण्यास समाजातून प्रोत्साहन मिळणे आवश्यक होय. देशाच्या लोकसंख्येच्या जवळपास अर्धी लोकसंख्या महिलांची असून राष्ट्र उत्थानाचे धोरण आखताना त्यांचा निर्णय निर्धारण प्रक्रियेतील सहभाग महिला सक्षमीकरणाला बळ देऊ शकते. भारतीय संविधानाच्या भाग-3 मधील अनुच्छेद कलम 14 ते 18 मध्ये दिलेल्या समतेच्या अधिकारानुसार कोणत्याही भेदभावाशिवाय सर्वच क्षेत्रात समान संधी, तसेच अनुच्छेद 35, 41, 45 47 इत्यादी मध्ये महिलांचा दर्जा उंचावण्या संदर्भातील तरतुदी केलेल्या आढळतात.

## पंचायत राज व्यवस्था :-

भारतामधील पंचायत राज व्यवस्थेचा इतिहास फार जुना आहे. स्वातंत्र्योत्तर काळात बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशीनुसार भारतात पंचायत राज व्यवस्थेची सुरुवात झाली. राजस्थान मधील नागोर जिल्ह्यात 2 ऑक्टोंबर 1959 रोजी भारतातील पहिले पंचायतराज व्यवस्थेचे उद्‌घाटन तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते झाले आणि भारतात पंचायतराज सुरू झाले. तेव्हापासून भारतात पंचायतराज व्यवस्था ही लोकप्रिय ठरली.

महाराष्ट्र मध्ये ही व्यवस्था जशीच्या तशी लागू न करता तत्कालीन महसूल मंत्री वसंतराव नाईक समिती नेमण्यात आली. श्री वसंतराव नाईक समितीने अनेक सुधारणासह केलेल्या शिफारशीनुसार महाराष्ट्र राज्यात 1 मे 1962 रोजी त्रि-स्तरीय पंचायत राज व्यवस्था लागु करण्यात आली. यातुनच स्थानिक नेतृत्वाला संधी मिळाली.

## 73 आणि 74 वी घटनादुरुस्ती :-

पंचायत राज व्यवस्थेला घटनात्मक दर्जा देण्याच्या हेतूने भारतीय संविधानातील 243 व्या कलमांद्वारे 1993 ला व्यापक दुरुस्ती करण्यात आली. या घटना दुरुस्तीने पंचायत राज ला घटनात्मक दर्जा तर मिळालाच तसेच अनुसूचित जाती व जमाती, मागासवर्ग आणि महिलांना त्यात राखीव जागा मिळाल्या. ही घटना दुरुस्ती 24 एप्रिल 1994 पासून लागू झाल्यामुळे 24 एप्रिल हा दिवस राष्ट्रीय पंचायत राज दिन म्हणुन साजरा करण्यात येतो.

ग्रामीण तथा शहरी पंचायत राज व्यवस्थेत महिलांना 33% आरक्षण देऊन महिला सरपंच, पंचायत समिती सभापती, जि.प. अध्यक्षा, नगराध्यक्ष, महापौर इत्यादी पदांसाठी आरक्षण लागू केले. यामुळे महिलांना राजकीय क्षेत्रात येण्यासाठी संधी उपलब्ध झाली.

## पंचायतराज व्यवस्थेत महिलांची स्थिती :-

स्वातंत्र्यानंतर ग्रामीण विकास प्रक्रियेत जनतेला प्रत्यक्ष सहभागी करून घेण्याच्या हेतूने भारतात पंचायत राज व्यवस्थेची स्थापना करण्यात आली. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 243(ड) मधील दुरुस्ती नुसार अनुच्छेद 243(ग) महिलांकरिता 50% आरक्षणाची तरतूद करण्यात आली. महाराष्ट्रामध्ये हा कायदा 24 एप्रिल 2011 रोजी लागू करण्यात आला. त्यामुळे पंचायत राज व्यवस्थेत महिलांना पुरुषांबरोबर किंवा त्यांच्याही पेक्षा जास्त जागा देण्याची तरतूद करण्यात आली. त्यामुळे महिलांना सक्षम होण्याकरिता महत्त्वाचे पाऊल महाराष्ट्र शासनाने उचलले आहेत आणि त्या कारणाने महाराष्ट्रातील ग्रामपंचायत, पंचायत समित्या, जिल्हा परिषद यामध्ये महिलांना राजकीय संधी उपलब्ध करून देण्यात आली आणि त्या संधी च्या माध्यमातून आज महिला गावाचा विकास करताना दिसून येत आहेत.

पंचायतराज व्यवस्थेत महिलांचा सहभाग पुरुषांबरोबरीचा असुन निर्णय निर्धारण प्रक्रियेत महिलांचा सहभाग दिसून येत आहे. पंचायत राज ने तयार केलेले नेतृत्व राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर सक्षम नेतृत्व करीत असल्याचे दिसुन येते. निश्चितच हे महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल होय.

प्रस्तुत शोध प्रबंधांमध्ये प्रश्नावलीच्या माध्यमातून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारावर महिला सक्षमीकरण आणि पंचायतराज व्यवस्था एक विश्लेषणात्मक अध्ययन या शोधप्रबंधामध्ये केलेले आहे.

**सारणी क्रमांक 1**

**महिला सक्षमीकरणांमध्ये पंचायतराज व्यवस्थेचे स्थान महत्त्वपूर्ण बाबत सारणी.**

| अ.क्र. | विवरण | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1) | महिला सक्षमीकरणामध्ये पंचायत राज व्यवस्थेचे स्थान महत्वपुर्ण आहे. | 70 | 70.00% |
| 2) | महिला सक्षमीकरणामध्ये पंचायत राज व्यवस्थेचे स्थान महत्वपुर्ण नाही | 30 | 30.00% |
| | **एकुण** | **100** | **100.00%** |

(स्त्रोत - व्यक्तिगत सर्वेक्षणाच्या आधारावर)

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की, महिलांच्या सक्षमीकरणामध्ये पंचायत राज व्यवस्थेची महत्वपूर्ण भूमिका आहे. असे 70% टक्के मत प्रश्नावलीच्या माध्यमातून स्पष्ट होते. तर महिलांच्या सक्षमीकरणामध्ये पंचायत राजची भुमिका महत्वपुर्ण नाही से मत 30% उत्तरदात्यांनी प्रश्नावलीमध्ये सादर केलेले आहे. तर यावरुन असे सिध्द होते की, 70% उत्तरदात्यांनी असे मत व्यक्त केले आहे की, महिलांच्या सक्षमीकरणाकरीता पंचायत राज व्यवस्थेची भुमिका महत्वपुर्ण आहे. त्यामुळे महिलांचे सक्षमीकरण झालेले आहे.

**सारणी क्रमांक 2**

**पंचायत राज व्यवस्थेमुळे महिलांचा दर्जा व स्थानविषयी सारणी**

| अ.क्र. | विवरण | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1) | पंचायत व्यवस्थेमुळे महिलांचा दर्जा व स्थान वाढलेले आहे. | 80 | 80.00% |
| 2) | पंचायत व्यवस्थेमुळे महिलांचा दर्जा व स्थान वाढलेले नाही. | 20 | 20.00% |
| | **एकुण** | **100** | **100.00%** |

(स्त्रोत - व्यक्तिगत सर्वेक्षणाच्या आधारावर)

वरील सारणीवरुन असे सिध्द होते की, पंचायत राज व्यवस्थेमुळे महिलांचा दर्जा व स्थान यामध्ये सुधारणा झालेली आहे यासंबंधी चे मत 80% उत्तरदात्यांनी दिलेले आहेत. तर पंचायत राज व्यवस्थेमुळे महिलांचे स्थान व दर्जा सुधारलेला नाही असे 20% उत्तरदात्यांनी आपले मत व्यक्त केलेले आहे. यावरुन असे सिध्द होते की, पंचायत राज व्यवस्थेमुळे महिलांचा दर्जा व स्थान उंचावलेला आहे.

**सारणी क्रमांक 3**

**73 व्या घटना दुरुस्तीमुळे राजकीय सहभाग वाढला याविषयीची सारणी**

| अ.क्र. | विवरण | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1) | 73 व्या घटना दुरुस्तीमुळे पंचायत राज व्यवस्थेत महिलांचा राजकीय सहभाग वाढला आहे. | 75 | 75.00% |
| 2) | 73 व्या घटना दुरुस्तीमुळे पंचायत राज व्यवस्थेत महिलांचा राजकीय सहभाग वाढला नाही. | 25 | 25.00% |
| | **एकुण** | **100** | **100.00%** |

(स्त्रोत - व्यक्तिगत सर्वेक्षणाच्या आधारावर)

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की, 73 व्या घटना दुरुस्तीमुळे पंचायत राज व्यवस्थेत महिलांचा राजकीय सहभाग वाढला आहे याचे प्रमाण 75% दिसुन येते. तर 73 व्या घटनादुरुस्ती मुळे महिलांचा राजकीय सहभाग वाढला नसल्याचे शेकडा प्रमाण 25% दिसुन येते यावरुन असे स्पष्ट होते की, 73 व्या घटनादुरुस्तीमुळे पंचायत राज व्यवस्थेत महिलांचा सहभाग वाढलेला आहे.

**संदर्भ ग्रंथ सुची :-**

1. देवगांवकर, रा.गो. पंचायत राज आणि सामुहिक विकास- श्री.साईनाथ प्रकाशन, नागपुर.
2. बंग, आर.के. – भारतातील स्थानीक स्वशासन महाराष्ट्र राज्य – श्री.मंगेश प्रकाशन, नागपुर.
3. भोळे, डॉ. भा.ल., भारतीय शासन आणि राजकारण-साईनाथ प्रकाशन, नागपुर.
4. विघे, डॉ. प्रशांत – निवडक देशांची संविधाने आणि आंतरराष्ट्रीय संघटना-श्री.साईनाथ प्रकाशन, नागपुर.
5. देवळणकर, डॉ.शैलेंन्द्र- समकालीन जागतीक राजकारण-विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.
6. वराडकर, र.घ.-समकालीन राजकीय व्यवस्था-निराली प्रकाशन, पुणे.
7. भणगे, डॉ.आर.पी.-भारतातील स्थानिक स्वशासन, स्वराज्य संस्था-प्रशांत पब्लिकेशन, जळगांव.
8. आगलावे, प्रदीप-सामाजिक संशोधन पध्दती शास्त्रे व तंत्रे -विद्या प्रकाशन नागपुर आवृत्ती 1992.
9. भोळे, डॉ. भा.ल., भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण-पिंपळापूरे प्रकाशन, नागपुर.
10. लोटे रा.ज., भारताचे शासन आणि राजकारण-पिंपळापूरे प्रकाशन नागपुर-2009.
11. सिरथीकर, वा.म.- आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण-कॉन्टीनेटल प्रकाशन, पुणे.
12. गोडबोले, माधव-भारतीय संसदीय लोकशाहीची अग्नीपरिक्षा-राजहंस प्रकाशन, पुणे.
13. सारथी, अरुण – भारतीय लोकशाही शोध आणि आव्हाने- रविराज प्रकाशन, पुणे.